रामप्रहर गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०१३


# कर्जतमध्ये नेत्रचिकित्सा शिबिर उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील श्री धापया देवस्थान समितीच्या वतीने पनवेलच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १३७ जणांनी तपासणी करून घेतली. त्यापैकी ४५ जणांना मोतीबिंदू झाले असल्याचे निदान झाले.

धापया देवस्थानच्या सभागृहात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समितीचे अध्यक्ष महेंद्र चंदन यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. शशिकांत देसाई यांनी मार्गदर्शनामध्ये, हे ९७वे नेत्रचिकित्सा शिबिर आहे. या शिबिरांच्या माध्यमांतून शेकडो जणांना दृष्टी देण्याचे काम केले आहे, असे स्पष्ट केले.

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या डॉ. रसिका ठाकूर, स्नेहल बोराटे, प्रचिती कदम, रवी चौधरी, विनोद पाचधरे, विलास राऊत यांनी रुग्णांची तपासणी केली. त्यांना प्रकाश नगरकर, प्रभाकर असवले, रामकृष्ण मोकल आदींनी सहकार्य केले. या वेळी मनोज वरसोलीकर, प्रकाश आणेकर, जनार्दन परांजपे, गणेश शिंदे, रोहित मोबू, नीलेश गायकवाड आदी उपस्थित होते.



कर्जत येथील नेत्रचिकित्सा शिबिरात झालेली तपासणी. (छाया : विजय मांडे)

लोकमत मुंबई, बुधवार, दि. २० नोव्हेंबर २०१३

# कर्जतमध्ये नेत्रचिकित्सा शिबिर



रुग्णाची तपासणी करताना लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टमधील डॉक्टर

कर्जत : कर्जत शहरातील श्री धापया देवस्थान समितीच्या वतीने पनवेलच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १३७ जणांनी आपली तपासणी करुन घेतली. त्यापैकी ४५ जणांना मोतीबिंदू झाले असल्याचे निदान झाले.

धापया देवस्थानच्या सभागृहात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. शशिकांत देसाई यांनी मार्गदर्शनामध्ये हे ९७ वे नेत्रचिकित्सा शिबीर आहे. या शिबिराच्या माध्यमातून शेकडो जणांना दृष्टी देण्याचे काम केले आहे, असे स्पष्ट केले. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या डॉ. रसिका ठाकूर, स्नेहल बोराटे, प्रचिती कदम, रवी चौधरी, विनोद पाचधरे, विलास राऊत यांनी रुग्णांची तपासणी केली. (वार्ताहर)